जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद 7553
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- 20/१२/२०१७

प्रति,

**प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :-** जी.सी.सी.ऑगस्ट-२०१७ तील पुनर्परीक्षार्थी व नियमित लघुलेखन विद्यार्थ्यांसाठी जाने -२०१८ मध्ये होणाऱ्या परीक्षेत ऑनलाईन आवेदनपत्र भरणेसाठी लिंक उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ :-** १.जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/५१२८, दि.२८/०८/२०१७ चे पत्र.
२. शासननिर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३६/एसडी-२, दि.१६/११/२०१७.

संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये जुलै-२०१७ ते डिसेंबर-२०१७ या सत्रासाठी लघुलेखन विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी करणेसाठी लिंक देण्यात आलेली होती.

संदर्भ क्र.२ च्या शासननिर्णयानुसार शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन परीक्षेस नोव्हेंबर-२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर शासननिर्णयाच्या अनुषंगाने ऑगस्ट-२०१७ मधील पुनर्परीक्षार्थ्यांची (रिपीटर) व ऑनलाईन नोदणी झालेल्या नियमित लघुलेखन विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक २२/१२/२०१७ ते रविवार दिनांक ३०/१२/२०१७ पर्यंत लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ या सत्रासाठी ऑनलाईन नोंदणी केलेल्या लघुलेखन विद्यार्थ्यांचीच आवेदनपत्र उपलब्ध होतील. ऑनलाईन आवेदनपत्रे भरताना संस्थांनी पुनर्परीक्षार्थ्यांची माहिती अचूकपणे भरणे आवश्यक राहील. आपल्या संस्थेचेच रिपीटर विद्यार्थ्यांचेच आवेदनपत्र संस्थांनी भरताना विद्यार्थ्यांचा पूर्वीचा बैठक क्रमांक नोंदवावा.

| अ.क | शुल्क प्रकार | तपशील | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | परीक्षार्थ्यांचे नियमित शुल्काचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी व आवेदनपत्रांच्या प्रिंटआऊट काढण्याचा कालावधी | २२ डिसें. २०१७ ते २६ डिसें . २०१७ |
| २. | | नियमित शुल्क ऑनलाईन भरण्याचा कालावधी | २७ डिसें. २०१७ ते २८ डिसें . २०१७ |
| ३. | विलंब शुल्क | परीक्षार्थ्यांचे विलंब शुल्काचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी व विलंब आवेदनपत्राची प्रिंट आऊट काढण्याचा कालावधी | २७ डिसें. २०१७ ते २८ डिसें . २०१७ |
| ४. | | विलंब शुल्क ऑनलाईन भरण्याचा कालावधी | २९ डिसें. २०१७ ते ३० डिसें . २०१७ |

- परीक्षा केंद्र क्रमांक निवड तसेच परीक्षा दिनांक व वेळ याबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहितीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)